By Hand

A-0.0

महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील कक्षबंधाचे भाडे वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
निवासी आयुक्त यांचे कार्यालय,
महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग,
नवी दिल्ली -110001

शासन निर्णय :-निआ/व्यमस/कक्षबंध भाडे/2010/1055 दि. 29.07.2010

वाचा :- 1.विआ/आस्था/प्र.क.30/99/1992, दि.30 जानेवारी 1999
2.शा.नि.क.विआ/आस्था/प्र.क.30-अ/99/2475,दि. 20 एप्रिल 1999
3. विआ/लोप्रक/प्र.क.123/2001/3198, दि.6 ऑक्टोबर 2001
4. निआ/लोप्रक/प्र.क.256/2007/5136, दि.30.08.2007

शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे राज्य शासनाचे अतिविशिष्ट व्यक्ती/लोकप्रतिनिधी/मा.मंत्री,खासदार, आमदार, शासकीय अतिथी व शासकीय अधिकारी कर्मचारी व खाजगी अभ्यागत यांच्या निवासव्यवस्थेसाठी शासनातर्फे महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथील कक्षबंधाचे आरक्षण करण्यात येत आहे.

वरील शासन निर्णय व कार्यालयीन आदेशामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार <u>हा शासन निर्णय निर्गमित झाल्या दिनांकापासून दरवाढ आकारणी करण्यात येईल, अर्थात दिनांक 29.07.2010 रोजी 00.00 वाजे पासून लागू होतील.</u>

हा शासन निर्णय वित्त विभाग व्यय -4 यांचा अनौपचारिक संदर्भ क.375, दि. 17.6.2010 च्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

प्रधान सचिव व निवासी आयुक्त यांची मान्यता प्राप्त.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(अनूप बाधवा)
अपर निवासी आयुक्त

प्रतः-
सचिव, महाराष्ट्राचे राज्यपाल, राजभवन, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई.
मुख्य सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुबई.
अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुबई.
प्रधान सचिव, व्यय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुबई.
व्यवस्थापक, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली.
आस्थापना शाखा, निवासी आयुक्त कार्यालय, नवी दिल्ली.
नस्ती क. निआ/व्यमस/कक्षबंधभाडे/2010/780

परिशिष्ठ

| वर्गीकरण | दर<br>प्रति पलंग (प्रतिदिन)<br>(वातानुकूलित) | दर<br>प्रति कक्षबंध (प्रतिदिन)<br>(वातानुकूलित) |
|---|---|---|
| 1. राज्य शासनाचे शासकीय अतिथी म्हणून घोषित केलेल्या अतिविशिष्ठ व्यक्ती, मा. मंत्री, मा. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, राज्यमंत्री व तत्सम विधान मंडळाच्या समित्यांचे सभासद, लोकप्रतिनिधी (खासदार/आमदार) राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावरील अधिकारी/कर्मचारी, विविध केंद्रीय सेवांमधील महाराष्ट्र तुकडीतील सनदी अधिकारी, थेट सरकारी अधिपत्याखाली असलेली वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये, कृषी विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी, दिवाणी, फौजदारी व औद्योगिक न्यायालयाचे न्यायाधीश/सदस्य, मंत्री/राज्यमंत्री दर्जाप्राप्त व्यक्ती. | 50/- | 100/- |
| २. केंद्र व इतर राज्य शासनाचे कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी/कर्मचारी, राज्य शासनाचे अधिकारी/कर्मचारी शासकीय कामावर नसता आणि त्यांचे कुटुंबिय सदस्य, नगर पालिका, महानगर पालिका, मंडळे, विविध विद्यापीठे, राज्यातील विविध लावद (ट्रिब्युनल), प्राधिकरणे सार्वजनिक उपक्रम इत्यादिमधील अधिकारी/कर्मचारी शासकीय कामावर असताना. तसेच सनदी अधिकारी केंद्र व इतर राज्य शासनाच्या प्रतिनियुक्तीवर असताना. महाराष्ट्रातील सर्व माजी आमदार/खासदार, राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी. विविध आयोगाचे सदस्य, जिल्हा परिषदांचे सदस्य/पदाधिकारी, अधिस्वीकृत पत्रकार, राज्य शासनाच्या समित्यांचे अशासकीय सभासद, दलित मित्र पुरस्कार प्राप्त व्यक्ती व स्वातंत्र्य सैनिक. इतर राज्यांचे लोकप्रतिनिधी (खासदार/आमदार). | 200/- | 400/- |
| ३. खाजगी अभ्यागत, महानगर पालिका, नगर पालिका, मंडळे/महामंडळे, विविध प्राधिकरणाचे अधिकारी/कर्मचारी, स्वायत्त विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी व सिनेट सदस्य शासकीय कामावर नसताना. | ---- | 1500/- |

(अनूप बाधवा)
अपर निवासी आयुक्त.